# बसवंत गार्डन कट्टा




बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्र तसेच बसवंत गार्डन हे दोन्ही प्रकल्प केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे; तर साऱ्या देशभरातील नागरिकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले आहेत. येथे दिले जाणारे मधमाशी पालनाचे शास्त्रीय प्रशिक्षण कृषी उत्पादन वाढ आणि मधमाशीजन्य पदार्थांच्या माध्यमातून होणारी रोजगार निर्मिती या दोन्ही बाबतीत पूरक ठरत आहे. बसवंत गार्डन, आदर्श ग्राम संस्कृतीचे मॉडेल असलेले सेवरगांव या संकुलांमधील फळप्रक्रिया उद्योग, उपाहारगृह, सोविनीअर शॉपी, स्पोर्ट्स झोन, छोट्या मुलांसाठी खेळांच्या सुविधा असणारी स्वतंत्र जागा, पेंटिंग झोन अशी असंख्य आकर्षणे पर्यटकांना आकर्षित करतात. या परिसरात मधमाशी पालन व्यवसायाच्या संदर्भात परिसंवाद आयोजित केले जातात. मान्यवरांच्या सदिच्छा भेटी, अनेक शाळा व महाविद्यालये विद्यार्थ्यांच्या सहलीही आयोजित करतात. या साऱ्या उपक्रमांची थोडक्यात माहिती प्रस्तुत सदरातून दर महिन्यात घेऊ...



जळगाव जिल्हा राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या अध्यक्षा तथा जळगाव जिल्हा महिला सहकारी बँकेच्या अध्यक्षा ॲड. रोहिणीताई खडसे- खेवलकर यांनी अलिकडेच बसवंत गार्डनला सदिच्छा भेट दिली. येथील उपक्रमांची त्यांनी सविस्तर माहिती घेतली. तसेच विविध संकल्पनांविषयी आस्थेवाईकपणे जाणूनही घेतले. यावेळी त्यांचे स्वागत करताना बसवंत मधमाशी पालन प्रशिक्षण केंद्राचे प्रकल्प व्यवस्थापक श्री. नितीन कराळे. समवेत (डावीकडून) भारती अहिरे, सौ. सुवर्णा कराळे आणि जळगाव जिल्हा पतसंस्थेचे सचिव श्री. प्रदीप साळुंके.

## हॅण्ड बॅण्डचं हनी-बाँडिंग



बसवंत मधमाशी उद्यानाला भेट देण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांना 'हॅण्ड बॅण्ड' देण्याचा शुभारंभ नुकताच झाला. या उपक्रमाचे पहिले मानकरी आपला आनंद प्रदर्शित करताना...



बसवंत गार्डनचं प्रवेशद्वार म्हणजे जणुकाही निसर्गविषयक प्रबोधन आणि मनोरंजनाच्या जगात पदार्पण...



‘सेवरगांवा’तल्या टनेलमधला
उत्सुक फेरफटका...



मधमाशी पालनाची पद्धत समजावून घेताना आणि मधुपेट्यांची
प्रत्यक्ष ओळख करून घेताना महाविद्यालयीन विद्यार्थी...



‘बीनिव्हर्स’ पाठीशी असल्यावर सारं ‘युनिव्हर्स’ भेटीला आल्याचा अनुभव येतो; असंच या विद्यार्थ्यांचे प्रफुल्लित चेहरे सांगतायत बहुतेक...



‘सेवरगांव’ची सफर म्हणजे आनंदवारी, असंच सांगताहेत हे सारेजण...


बसवंत मधमाशी उद्यान
बसवंत हनी बी फेस्टीवल
२०२३
२१ ते ३० डिसेंबर २०२३
वेळ: सकाळी १० ते सायं. ५
• पर्यावरण संवर्धनासाठी मधमाशी पालन
• मधमाशी पालनातून आरोग्यदायी विविध उत्पादने
• उद्योजकता निर्मिती साठी मधमाशी पालन
• मधमाशीचे गांव आणि शहर
• मधमाशीची वसाहत दत्तक घेणे
या आणि इतर अनेक विविध उपक्रमांचा अंतर्भाव असलेला बसवंत हनी बी फेस्टीवल.
BEENIVERSE
+91 9699781639 / +91 7507757700
बसवंत मधमाशी उद्यान, मुखेड रोड,
पिंपळगांव बसवंत, जि. नाशिक (महाराष्ट्र)भारत